**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्याच्या विधानसभा निवडणुकी महायुतीचा दणदणीत विजय, भाजपाला पहिल्यांदाच १३० पेक्षा जास्त जागा

- महाविकास आघाडीतल्या पक्षांना मतदारांनी नाकारलं, काँग्रेसला अवघ्या १५ जागा

- महायुतीचा विजय म्हणजे विकास आणि सुशासनाचा विजय असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- सर्वसामान्यांच्या विकासाला प्राधान्य देऊन घटक पक्षांनी एकत्र काम केल्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला यश मिळाल्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

**आणि**

- झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा पुन्हा सत्तेकडे

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या जनतेनं यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला विक्रमी यश दिलं तर काँग्रेस आणि महाविकास आघाडीला कधी नव्हे इतक्या कमी जागा मिळाल्या.

आतापर्यंत १९६ जागांचे निकाल हाती आले आहेत. एकूण २८८ पैकी २२८ जागा महायुतीतल्या प्रमुख पक्षांना मिळतील असं चित्र आहे. त्यातला विचार करता भाजपाला ८० जागांवर विजय मिळाला असून ५० जागांवर हा पक्ष आघाडीवर

आहे. शिवसेनेला ३९ जागांवर विजय मिळाला असून १८ जागांवर हा पक्ष आघाडीवर आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला ३३ जागांवर विजय मिळाला असून ८ जागांवर हा पक्ष आघाडीवर आहे.

महाविकास आघाडीला ४५ जागा मिळतील असं चित्र आहे. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १६ जागांवर जिंकला असून ४ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेस ९ जागांवर विजयी झाला असून ६ जागांवर आघाडी घेऊन आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ६ जागांवर विजयी झाला असून ४ जागांवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

**आता मुंबई आणि कोकणातल्या परिस्थितीचा आढावा घेऊया.** एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या कोकणनं उद्धव ठाकरे यांना फारसा प्रतिसाद दिलेला नाही.

**मुंबई शहर** मधून भाजपाचे ३ उमेदवार निवडून आले आहेत. तर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांपैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ४ उमेदवार, काँग्रेसचे ३ उमेदवार निवडून आले आहेत.

**मुंबई उपनगरमधून** भाजपाचे १२ उमेदवार निवडून आले आहेत. तर शिवसेनेचे ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा १ उमेदवार निवडून आला आहे. तर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांपैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ४ उमेदवार, काँग्रेसचा १ उमेदवार निवडून आला आहे.

**रायगडमधून** भाजपाचे ३ उमेदवार निवडून आले आहेत. तर शिवसेनेचे ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा १ उमेदवार निवडून आला आहे. **रत्नागिरीमधून**

शिवसेनेचे ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १ उमेदवार निवडून आले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून भाजपाचा १ उमेदवार तर शिवसेनेचे २ उमेदवार निवडून आले आहेत.

ठाणे जिल्ह्यातून भाजपाचे ९ इतके उमेदवार निवडून आले आहेत. तर शिवसेनेचे ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १ उमेदवार निवडून आले आहेत. तर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा १ आणि समाजवादी पार्टीचा १ उमेदवार निवडून आला आहे.

**पालघर** जिल्ह्यातून भाजपाचे ३ उमेदवार निवडून आले आहेत. तर शिवसेनेचे २ उमेदवार निवडून आले आहेत.

**<><><><><>**

**पश्चिम महाराष्ट्रातल्या** ६ जिल्ह्यात महायुतीचं वर्चस्व राहिलं असून महाआघाडीला केवळ १० जागांवर समाधान मानावं लागलं आहे.

**पुणे**े जिल्ह्यात २१ जागांपैकी १८ जागा महायुतीने तर केवळ तीन जागा महाआघाडीने जिंकल्या आहेत.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात १२ जागांपैकी ८ जागांवर महायुतीने तर चार जागांवर महाविकास आघाडीने विजय मिळवला आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात११ जागांपैकी महायुतीला चार जागा तर महाविकास आघाडीला सात जागा मिळाल्या आहेत.

**सातारा** जिल्ह्यात आठ पैकी सर्व जागा महायुतीला मिळाल्या आहेत.

**कोल्हापूर** जिल्ह्यात दहाच्या दहा जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवला.. निवडणुकीत काँग्रेसचे दोन, तर महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एक अशा तीन विद्यमान आमदारांना पराभव पत्करावा लागला.

**सांगली** जिल्ह्यात सर्व आठ विधानसभा मतदारसंघाचे निकाल जाहीर झाले असून महायुतीला ५ तर महाविकास आघाडीला 3 जागा मिळाल्या आहेत.

**<><><><><>**

मराठवाड्यातल्या ४६ मतदारसंघांपैकी बहुसंख्य ठिकाणी महायुतीनं विजय मिळवला आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या नऊ, जालना जिल्ह्यातल्या पाच, **नांदेडमधल्या** नऊ आणि हिंगोलीमधल्या तिन्ही मतदारसंघात महायुतीनं निर्विवाद विजय  मिळवला आहे. परभणीतले चारपैकी तीन, बीडमधल्या सहापैकी पाच, लातूरमधल्या सहापैकी पाच मदारसंघात महायुती विजयी झाली आहे. तर महाविकास आघाडीनं **बीड, लातूर आणि परभणी** जिल्ह्यात प्रत्येकी एका ठिकाणी विजयी मिळाला आहे. **धाराशिव** जिल्ह्यात दोन्ही आघाड्यांना प्रत्येकी दोन जागांवर यश मिळालं आहे.

**उत्तर महाराष्ट्रात जळगाव** जिल्ह्यातल्या अकरा मतदारसंघात महायुतीने सर्वच्या सर्व जागा जिंकल्या आहेत. **अहिल्यानगरमधल्या** १२ पैकी दहा जागा महायुतीने जिंकल्या असून एका जागेवर काँग्रेसला यश आलं आहे. तर **कर्जत जामखेड** मतदारसंघातून रोहित पवार आघाडीवर आहेत. **धुळे** जिल्ह्यातल्या सर्व पाच, नाशिकमधल्या १५ पैकी १३, नंदुरबारमधल्या चारपैकी तीन जागांवर महायुती विजयी झाली आहे.

**<><><><><>**

**<u>अमरावती जिल्ह्यातील</u>** आठही विधानसभा मतदारसंघाचा निकाल हाती आला आहे. अटीतटीच्या झालेल्या या लढतीमध्ये अमरावती जिल्ह्यात अमरावती जिल्ह्यात आठ पैकी सात जागांवर महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. अमरावती मतदारसंघात  भाजपाला ५ जागांवर विजय मिळाला आहे. महायुती मधील अजित पवार पक्षाला  १ जागा, बडनेरा मतदारसंघातून महायुतीतील युवा स्वाभिमान पक्षाला १ जागा  अशा एकूण सात जगावर महायुतीचा विजय झाला.

दर्यापूर मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला १ जागा मिळाली.

**यवतमाळ जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघांपैकी महायुतीने पाच जागांवर आघाडी घेतली आहे. ७ पैकी ३ जागा भाजपाने जिंकल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाने प्रत्येकी एक जागा जिंकली आहे. वणीत महाविकास आघाडीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला १ जागा मिळाली, यवतमाळ मध्ये अद्यापही मतमोजणी पूर्ण व्हायची असून तिथं काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत.**

**भंडारा गोंदिया जिल्ह्यात** सात पैकी सहा जागा महाविकास आघाडीनं गमावल्या.

**गोंदियात** भाजपाच्या तीन जागा तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची एक जागा अशा चारही जागा महायुतीनं जिंकल्या. महाविकास आघाडीला तिथं खातं उघडता आलं नाही.

**वाशिम** विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या ३ जागा जिंकून आल्या . वाशीम जिल्ह्यातील रिसोड विधानसभा मतदारसंघामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला विजय मिळाला.

**बुलढाणा** जिल्ह्यात महायुतीला ६ जागा मिळाल्या असून महाविकास आघाडीनं १ जागा मिळवली

**अकोला** जिल्ह्यात बाळापूर विधानसभा मतदार संघात 27 फेरी अंती
उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे नितिन देशमुख 6 हजार 912 मतांनी पुढे आहेत. .

**गडचिरोली** जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघांपैकी दोन मतदारसंघांमध्ये महायुतीचे, तर एका मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार विजय मिळवला. अहेरी, गडचिरोली महायुतीकडे आले असले तरी आरमोरीत काँग्रेस विजयी ठरली आहे.

**नागपूर** शहराच्या ६ मंतदारसंघनामध्ये ४ ठिकाणी महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहेत. नागपूर पश्चिम मधून काँग्रेसला एक जागा मिळाली

नागपूर उत्तर मधून काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे. नागपूर ग्रामीण मधील ६ मंतदारसंघनामध्ये ५ ठिकाणी महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहे . हिंगणा, सावनेर आणि काटोल मधून भाजपा आघाडीवर , तर कामठी इथं भाजप विजयी झाला आहे. उमरेड मध्ये काँग्रेस विजयी झाला असून रामटेक मध्ये शिवसेना शिंदे गटाला विजय मिळाला आहे.

**<><><><>**

महायुतीचा हा विजय म्हणजे विकास आणि सुशासनाचा विजय झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, राज्यातल्या मतदारांचे विशेषत: महिला आणि युवकांचे आभार मानले.

**<><><><>**

सर्वसामान्यांच्या विकासाला प्राधान्य देऊन घटक पक्षांनी एकत्र काम केल्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. सर्वांगीण विकास करताना सर्व घटकांचा विचार केला आणि लाडकी बहीणसारख्या योजना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**हाेल्ड एकनाथ शिंदे (२७ सेकंद)**

योजना फक्त कागदावर न ठेवता त्याची अंमलबजावणीही केल्याचं ते म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार हेही उपस्थित होते. मोदी सरकारच्या पाठबळामुळे हा विजय शक्य झाल्याचं फडनवीस यांनी सांगितलं.

**हाेल्ड (१८ सेकंद)**

हा आतापर्यंतचा सगळ्यात मोठा विजय असल्याचं अजित पवार यावेळी म्हणाले.

**हाेल्ड (२३ सेकंद)**

**<><><><>**

महाराष्ट्रातले निकाल अनपेक्षित असून आम्ही त्यावर सविस्तर विचार करु, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी समाजमाध्यमात व्यक्त केली आहे.

झारखंडमधे इंडिया आघाडीला जनादेश दिल्याबद्दल तिथल्या जनतेला त्यांनी धन्यवाद दिले आहेत. मुख्यमंत्री हेमंत सोरेन, कांग्रेस आणि झारखंड मुक्ती

मोर्चाच्या सर्व कार्यकर्त्यांना या विजयाबद्दल राहुल गांधी यानी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

विधानसभेचे आज लागलेले निकाल अनपेक्षित आणि अनाकलनीय असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. ते आज मुंबईत मातोश्री इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. ते म्हणाले,

**होल्ड... बाईटः उद्धव ठाकरे**

राज्यात वाढलेली महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, महिलांच्या अडचणी अशी परिस्थिती असताना लोकांनी महायुतीला मतदान कसं केलं, हे कळत नाही, असं ठाकरे म्हणाले. मात्र जिंकलेल्यांचं अभिनंदन करून राज्यात आता अस्सल भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

या विधानसभा निवडणुकीत अनेक प्रस्थापित नेत्यांना पुन्हा एकदा जनतेचा कौल मिळवण्यात यश आलं. **भाजपाचे** विजयकुमार गावित नंदुरबारमधून, गिरीश महाजन जामनेरमधून, देवेंद्र फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून, श्रीजया चव्हाण भोकरमधून, संतोष दानवे भोकरदनमधून, अतुल सावे औरंगाबाद पूर्वमधून, सुहास कांदे नांदगांवमधून, रवींद्र चव्हाण डोंबिवलीतून, गणेश नाईक ऐरोलीतून, राम कदम घाटकोपर पश्चिममधून, आशीष शेलार वांद्रे पश्चिममधून, राधाकृष्ण विखे-पाटील शिर्डीतून, नितेश राणे कणकवलीतून विजयी झाले आहेत. **शिवसेनेचे** आमश्या पाडवी अक्कलकुव्यातून, गुलाबराव पाटील जळगाव ग्रामीणमधून, संजय राठोड दिग्रसमधून, अब्दुल सत्तार सिल्लोडमधून, संजय शिरसाट औरंगाबाद पश्चिममधून, दादाजी भुसे मालेगाव बाह्यमधून, राजेंद्र गावित

पालघरमधून, एकनाथ शिंदे कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून, राहुल नार्वेकर कुलाब्यातून, शहाजी पाटील सांगोल्यातून, उदय सामंत रत्नागिरी, किरण सामंत राजापूर, निलेश राणे कुडाळ, दीपक केसरकर सावंतवाडीतून जिंकले आहेत. **राष्ट्रवादी काँग्रेसचे** छगन भुजबळ येवल्यातून, नरहरी झिरवाळ दिंडोरीतून, सना मलिक अणुशक्तीनगरमधून तर हसन मुश्रीफ यांना कागलमधून मतदारांनी कौल दिला आहे.

**काँग्रेसचे** नितिन राऊत नागपूर उत्तरमधून, विजय वडेट्टीवार ब्रह्मपुरीतून, ज्योती गायकवाड धारावीतून, अमित देशमुख लातूर शहरमधून, विश्वजीत कदम पलूस-कडेगावमधून विजयी ठरले आहेत. **राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार** पक्षाचे जितेंद्र आव्हाड मुंब्रा-कळवा इथून, आदिती तटकरे श्रीवर्धनमधून, दिलीप वळसे पाटील आंबेगावमधून, अजित पवार बारामतीतून, रोहित पवार कर्जत-जामखेडमधून, जयंत पाटील इस्लामपूरमधून, रोहित पाटील तासगांव-कवठे महांकाळमधून विजयी झाले आहेत. **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे** पक्षाचे अनंत नर जोगेश्वरी पूर्वमधून, वरूण सरदेसाई वांद्रे पूर्वमधून, महेश सावंत माहिममधून, आदित्य ठाकरे वरळीतून, अजय चौधरी शिवडीतून, भास्कर जाधव गुहागरमधून जनतेचा कौल मिळवण्यात यशस्वी झाले आहेत. याशिवाय **स्वाभिमानी** पक्षाचे रवी राणा बडनेरामधून तर समाजवादी पक्षाचे अबू आझमी मानखुर्द-शिवाजीनगरमधून विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

यावेळच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानं अनेक महत्त्वाच्या उमेदवारांना पराभवाचा धक्काही दिला. त्यात काँग्रेसचे संगमनेरचे उमेदवार बाळासाहेब थोरात, लातूर ग्रामीणमधून धीरज देशमुख, कराड दक्षिणमधून माजी मुख्यमंत्री पृथ्विराज चव्हाण, काँग्रेसमधून बंडखोरी करून महाविकास आघाडीच्या

पाठिंब्याने कोल्हापूर उत्तरमधून अपक्ष निवडणूक लढवलेले राजेश लाटकर, शिवसेनेचे वरळीचे उमेदवार मिलिंद देवरा, मुंबादेवीतून शायना एन. सी., शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाण्याचे उमेदवार राजन विचारे, राष्ट्रवादीचे मानखुर्द-शिवाजीनगरचे उमेदवार नवाब मलिक, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूरचे उमेदवार हर्षवर्धन पाटील, मुक्ताईनगरमधून रोहिणी खडसे, अहेरीतून भाग्यश्री अत्राम, माळशिरसमधून भाजपाचे राम सातपुते यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

अनेक युवा चेहऱ्यांना यंदा जनतेने विधानसभेत जाण्याची संधी दिली आहे. यामध्ये अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण, रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव, खासदार संदिपान भुमरे यांचे पुत्र विलास भुमरे, नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक आणि राज्याचे दिवंगत गृहमंत्री आर आर पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांचा समावेश आहे.

काही नवोदितांसह अनेक प्रस्थापितांना यंदा जनतेने नाकारलं आहे, यामध्ये राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे, शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार, एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे तसंच प्रहार जनशक्तीचे बच्चू कडू, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, राजेश टोपे आदींचा समावेश आहे.

**<><><><><>**

वडगाव शेरी मतदारसंघात मतदान यंत्रात घोळ झाल्याचा आरोप बहुजन समाज पक्षाचे उमेदवार हुलगेश चलवादी यांनी केला आहे. मतदान यंत्रणेतल्या

घोटाळ्याविरुद्ध आपण सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचं त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीचे बहुसंख्य कल आता जाहीर झाले आहेत. यात भाजपाला २६ पूर्णांक ७२ शतांश टक्के, शिवसेनेला १२ पूर्णांक ३८ शतांश टक्के, राष्ट्रवादी काँग्रेस ९ पूर्णांक ८ शतांश टक्के, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे १० पूर्णांक ४ शतांश टक्के, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाला ११ पूर्णांक ३० शतांश टक्के, काँग्रेस १२ पूर्णांक २४ शतांश टक्के, मनसे १ पूर्णांक ५६ शतांश टक्के तर इतर पक्ष आणि अपक्षांना मिळून १३  पूर्णांक ८५ शतांश टक्के मतदान मिळालं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा १९९० पासूनचा इतिहास पाहता भाजपानं यंदाच्या निवडणुकीत गेल्या ३ दशकातल्या सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत तर काँग्रेसनं १९९० नंतरच्या सर्वात कमी जागा जिंकल्याचं◌ं यंदा दिसून येतंय. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट (अर्पणा खुंट)**

*आत्ताच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या* ***भाजपाला*** *सन १९९०च्या निवडणुकीत ४२ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर १९९५मध्ये भाजपाला ६५, तर १९९९मध्ये ५६ जागांवर समाधान मानावं लागलं. २००४मध्ये ५४, तर २००९मध्ये ४६ जागा मिळालेल्या भाजपानं २०१४मध्ये जवळपास तिप्पट जागांवर बाजी मारली. २०१९मध्ये हा आकडा काहीसा घसरून १०५वर स्थिरावला.*

*१९९०मध्ये १४१ जागांवर विजय मिळवलेल्या* ***काँग्रेसला*** *त्यानंतर उतरती कळा लागल्याचं दिसतं. १९९५मध्ये ८६, १९९९मध्ये ७५, तर २००४मध्ये ६९ जागांवर काँग्रेसची घसरण झाली. त्यानंतर २००९च्या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा वाढून ८२पर्यंत गेल्या, पण पुढच्याच, २०१४च्या निवडणुकीत जवळपास निम्म्यावर, म्हणजे ४२वर आल्या. २०१९मध्ये यात अवघ्या दोन जागांची वाढ झाली.*

***शिवसेनेला*** *१९९०च्या निवडणुकीत ५२ जागा मिळाल्या होत्या, त्या १९९५मध्ये वाढून ७३वर गेल्या, नंतरच्या दोन निवडणुकांमध्ये यात थोडी घट होऊन शिवसेनेला ६९ आणि ६२ जागा मिळाल्या. २००९मध्ये पक्षाच्या आमदारांची संख्या ४४पर्यंत घसरली, पण २०१४ला पुन्हा वाढून ६३वर पोहोचली. विद्यमान विधानसभेत शिवसेनेचे ५६ आमदार आहेत.*

*१९९९पासून निवडणुकीत उतरलेल्या* ***राष्ट्रवादी काँग्रेस*** *पक्षानं पहिल्याच निवडणुकीत ५८, त्यानंतर २००४मध्ये ७१ आणि २००९मध्ये ६२ जागांवर विजय मिळवला होता. २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर समाधान मानावं लागलं, तर २०१९मध्ये हा आकडा ५४ पर्यंत गेला.*

***महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं*** *२००४ला पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरून ३ जागांवर विजय मिळवला. २००९ मध्ये हा आकडा १३ वर गेला. मात्र, २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकांमध्ये मनसेचा एक-एक आमदारच विधानसभेत पोहोचला.*

***मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला*** *१९९० आणि १९९५च्या निवडणुकीत प्रत्येकी ३ जागा मिळाल्या होत्या, मात्र नंतरच्या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांना एकही विजय मिळवता आला नाही. गेल्या तीन निवडणुकांमध्ये या पक्षाचा एकच आमदार विजयी झाला आहे.*

<><><><><>

झारखंड विधानसभेच्या ८१ जागांच्या आत्तापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार झारखंड मुक्ती मोर्चानं २७ जागांवर विजय मिळवला आहे, तर ७ जागांवर आघाडी घेतली आहे. भाजपाला १६ जागा, तर ५ जागांवर आघाडी आहे. काँग्रेसला ११ जागांवर विजय, तर ५ जागांवर आघाडी आहे. राष्ट्रीय जनता दलाला ३ जागांवर, कम्युनिस्ट पक्ष मार्क्सिस्ट लेनिनिस्टला २ जागांवर विजय मिळाला आहे. लोक जनशक्ती पक्ष (राम विलास) आणि झारखंड लोकतांत्रिक क्रांतिकारी मोर्चा या दोन्ही पक्षांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे.

<><><><><>

काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत विजय मिळवला आहे. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सत्यन मोकेरी यांचा ४ लाख १० हजार ९३१ मतांच्या फरकानं पराभव केला. प्रियांका यांना ६ लाख २२ हजार ३३८, तर मोकेरी यांना १ लाख ११ हजार ४०७ मतं मिळाली. भाजपाच्या नव्या हरिदास तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांना १ लाख ९ हजार ९३९ मतं मिळाली. दरम्यान, नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी अद्याप सुरू आहे. भाजपाचे संतुकराव हंबर्डे यांनी काँग्रेसच्या रवींद्र चव्हाण यांच्यावर ४६ हजारापेक्षा जास्त मतांची आघाडी घेतली आहे.

<><><><><>

याशिवाय, विविध राज्यांतल्या विधानसभांच्या पोटनिवडणुकांची मतमोजणीही आज सुरु आहे. यापैकी ४३ जागांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. **आसाममधल्या** पाचपैकी तीन जागांवर भाजपानं, तर युनायटेड पीपल्स पार्टी लिबरल आणि आसोम गण परिषद या पक्षांनी प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला

आहे. **बिहारमधल्या** चारपैकी दोन जागी भाजपानं, तर प्रत्येकी एका जागेवर हिंदुस्तानी आवाम मोर्चा सेक्युलर आणि संयुक्त जनता दलानं बाजी मारली आहे. **छत्तीसगड** आणि **गुजरातमधल्या** प्रत्येकी एका जागेवर भाजपाची सरशी झाली आहे. **कर्नाटकातल्या** तिन्ही जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. **केरळमध्ये** दोनपैकी प्रत्येकी एक जागा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेसनं जिंकली आहे. **मध्य प्रदेशातल्या** एका जागेवर भाजपा आणि एका जागेवर काँग्रेस विजयी झाली आहे. **मेघालयमधली** एक जागा नॅशनल पीपल्स पार्टीनं आपल्या नावावर केली आहे. **पंजाबमधल्या** तीन जागांवर आम आदमी पक्षानं तीन, तर काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला आहे. **राजस्थानातल्या** सातपैकी पाच जागांवर भाजपाची सरशी झाली आहे, तर प्रत्येकी एका जागेवर काँग्रेस आणि भारत आदिवासी पक्षाचा विजय झाला आहे. **सिक्किममधल्या** दोन्ही जागांवर सिक्किम क्रांतिकारी मोर्चानं विजय मिळवला आहे. **उत्तर प्रदेशातल्या** सहा जागांवर भाजपा, दोन जागांवर समाजवादी पार्टी, तर एका ठिकाणी राष्ट्रीय लोक दलाचा उमेदवार निवडून आला आहे. **उत्तराखंडमधली** एक जागा भाजपानं आपल्या नावावर केली आहे. तर **पश्चिम बंगालमधल्या** सहापैकी सहा जागा तृणमूल काँग्रेसनं जिंकल्या आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी ते सर्वपक्षीय सदस्यांना सहकार्याचं आवाहन करतील. संसदेचं अधिवेशन  येत्या

सोमवारी सुरु होत असून ते २० डिसेंबरपर्यंत चालेल. येत्या २६ नोव्हेंबरला संविधानदिनानिमित्त सभागृहाची बैठक होणार नाही.

**<><><><><>**

मुंबई शहर जिल्ह्यातल्या दहा विधानसभा मतदारसंघापैकी ९ जागांवरील निकाल घोषित करण्यात आले आहेत. यातील चार जागांवर भाजपचे उमेदवार तीन उमेदवार निवडून आले असून एका जागेवर भाजप आघाडीवर आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे चार उमेदवार विजयी झाले आहेत. तर, काँग्रेस पक्षाचे दोन उमेदवार निवडून आले आहेत. मुंबई शहर जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही उमेदवार विजयी होऊ शकला नाही.

भाजपकडून कुलाबा मतदारसंघात राहुल नार्वेकर, मलबार हिल येथून मंगल प्रभात लोढा, वडाळा विधानसभेत कालिदास कोळंबकर विजयी झाले आहेत. तर, सायन कोळीवाडा मतदारसंघात कॅप्टन तमिळ सेल्वन हे १९व्या फेरीअखेर ७ हजार ८८० मतांनी आघाडीवर आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून भायखळा मतदारसंघात मनोज जामसुतकर, शिवडीतून अजय चौधरी, वरळीतून आदित्य ठाकरे आणि माहिम मतदारसंघातून महेश सावंत हे चार उमेदवार विजयी झाले आहेत. सोबतच मुंबादेवी मतदारसंघातून अमिन पटेल, धारावीतून ज्योती गायकवाड हे दोन काँग्रेसचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भारतीय जनता पक्षाने ठाणे जिल्हयाचा गड राखला असून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला भोपळाही फोडता आलेला नाही. त्यामुळे एका अर्थानं जिल्ह्यातून उद्धव आणि राज ठाकरे या दोन्ही भावांच्या पक्षाला एकप्रकारे हद्दपार व्हावं लागलं आहे.

संपूर्ण जिल्हयाचं लक्ष लागलेल्या कोपरी पाचपाखाडी या मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांच्या लढतीमध्ये शिंदे हे एक लाख २० हजार ७१७ मतांनी विजयी झाले. दिघे यांना दारुण पराभवाला सामोरं जावं लागलं आहे.

कळवा मुंब्रा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पक्षाचे शरद पवार **पक्षाचे** जितेंद्र आव्हाड विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार ) लढतीमध्ये आव्हाड यांचा विजय झाला आहे. तर मुल्ला यांना पराभव पत्करावा लागला. डोंबिवलीतून भाजपचे उमेदवार आणि मंत्री रवींद्र चव्हाण विरुद्ध उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दीपेश म्हात्रे लढतीमध्ये चव्हाण यांचा विजय झाला तर म्हात्रे यांना पराभवाला सामोरं जावं लागलं.

ठाणे जिल्हयात भाजपनं नऊ पैकी नऊ जागा जिंकल्या. तर शिंदे यांच्या शिवसेनेनं सात पैकी सहा जागा जिंकल्या. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जिल्हयात दोन जागा लढवल्या. त्यापैकी शहापूरच्या जागेवर त्यांना विजय मिळवता आला आहे.

महाविकास आघाडीतील उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या पक्षाने दहा आणि काँग्रेसनं दोन जागा लढल्या. या दोन्ही पक्षांना एकही जागा जिंकता आली नाही. राष्ट्रवादी शरद पवार पक्षानं पाच पैकी एक तर सपानं रईस शेख यांच्या रुपानं एक जागा जिंकली आहे.

नवी मुंबईतल्या बेलापूर विधानसभा मतदारसंघांतून महायुतीच्या भाजपाच्या उमेदवार मंदा म्हात्रे तिसऱ्यांदा विजयी झाल्या आहेत. अवघ्या 377  मतांनी त्यांनी महाविकास आघाडीतल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संदीप नाईक यांचा पराभव केला. मंदा म्हात्रे यांना एकूण 91 हजार 852 मते मिळाली

आहेत तर संदीप नाईक यांना 91 हजार 475 मतं मिळाली आहेत. तर तिसऱ्या क्रमांकावर एकनाथ शिंदे गटाचे बंडखोर उमेदवार विजय नाहटा यांना 19 हजार 646 मतं मिळाली आहेत. तर तब्बल 2 हजार 588 मते नोटा ला मिळाली आहेत.

<><><><><>

बॉर्डर गावस्कर करंडक मालिकेतल्या पहिल्या सामन्यात दुसऱ्या दिवसअखेर भारताकडे २१८ धावांची आघाडी आहे. पर्थ इथं सुरू असलेल्या या सामन्याच्या दुसऱ्या डावात यशस्वी जयस्वालच्या नाबाद ९० आणि के. एल. राहुलच्या नाबाद ६२ धावांमुळं भारत दुसऱ्या डावात बिनबाद १७२ धावांवर आहे. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या १०४ धावात आटोपला. जसप्रीत बुमराहनं पाच गड्यांना तंबूत धाडलं, तर हर्षित राणानं तीन आणि मोहम्मद सिराजनं दोन गड्यांना बाद केलं. तत्पूर्वी भारताचा पहिला डावही १५० धावांवर गुंडाळला होता. जॉश हेझलवुडनं चार, तर मिशेल स्टार्क, पॅट कमिन्स आणि मिशेल मार्श यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले होते.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली आहे. उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या  जवळपास होते.

येत्या दोन दिवसात इतरत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//